शासकीय कामकाजानिमित्त हवाई प्रवासासाठी विमान भाडेतत्वावर घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-एव्हीएन २००९/प्र.क्र.६०३/२८अ
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ३१ जुलै, २०१०

<u>वाचा-</u> (१) संचालक, विमान चालन संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.डीए/एडीएम/१५४५/०९
दिनांक ९.१२.२००९

(२) विमान चालन संचालनालयाचे पत्र क्रमांक डीए/एडीएम/३८१/२०१०
दिनांक ४ मार्च २०१०

<u>प्रास्ताविक-</u>

शासकीय कामकाजानिमित्त हवाई प्रवासासाठी विमान चालन संचालनालयाअंतर्गत सुपर किंग एअर बी-३५० (जुलै १९९८), सायटेशन एक्सएलएस (ऑगस्ट २००८) ही दोन विमाने आणि हेलिकॉप्टर [illegible] (मार्च २०००) उपलब्ध आहे. जुलै,१९९८ मध्ये खरेदी केलेल्या सुपर किंग एअर बी-३५० च्या सुट्या [illegible] खरेदी आणि परिरक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्यामुळे सदर विमान वापरांत ठेवणे [illegible] नसल्यामुळे सदर विमानाची विक्री करणे आणि फाल्कन किंवा गल्फस्ट्रीम प्रकारचे मध्यम आकाराचे [illegible] भाडेतत्वावर घेण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने सुपर किंग एअर [illegible] ची प्रचलित शासन आदेश/कार्यपध्दतीनुसार विक्री करण्याबाबत आणि शासकीय कामानिमित्त [illegible] प्रवासासाठी एक मध्यम आकाराचे अद्ययावत(९+२ आसने) विमान भाडेतत्वावर घेण्याबाबत निर्णय [illegible] आहे. यासंदर्भात सुपर किंग एअर बी-३५० ची विक्री करण्याबाबतची प्रक्रिया स्वतंत्ररित्या सुरु आहे.

१.१ दरम्यान, विमान चालन संचालनालयाने शासकीय कामकाजानिमित्त हवाई दौऱ्यासाठी विमान [illegible] घेण्याकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत वर्तमानपत्रांमध्ये फेब्रुवारी २०१० [illegible] आठवड्यामध्ये जाहिरात दिली होती. यासंदर्भात विमान चालन संचालनालयाने त्यांचे संदर्भाधिन पत्र दिनांक [illegible] मार्च २०१० अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार ज्या संस्थांनी जाहिरातीनुसार दरपत्रके सादर [illegible] होती, त्यासंबंधीचा प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील विमान चालन क्षेत्रासंबंधीच्या [illegible] समितीच्या दिनांक २२ एप्रिल २०१० च्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत आला.

१.२ शक्तीप्रदत्त समितीच्या उपरोक्त बैठकीमध्ये सादर केलेल्या प्रस्तावानुसार जीव्हीके [illegible] प्रा.लि.मुंबई, ताज एअर लि./एमएबी एव्हीएशन, मुंबई आणि ग्लोबल प्रोजेक्टस् ॲन्ड एव्हिएशन प्रा.लि.मुंबई [illegible] सादर केलेल्या दरपत्रकांबाबत सदर समितीच्या बैठकीमध्ये विचारविनिमय करण्यांत आला आणि त्यानुसार [illegible] ग्लोबल प्रोजेक्टस् ॲन्ड एव्हिएशन प्रा.लि.मुंबई यांचे दरपत्रक सर्वांत कमी दराचे असल्यामुळे मे. ग्लोबल [illegible] ॲन्ड एव्हिएशन प्रा.लि.मुंबई यांचेकडून विमान भाडेतत्वावर घेण्यात यावे आणि याकरिता सदर कंपनी [illegible] विहीत करार करण्यासाठी सचिव(विमान चालन) यांना प्राधिकृत करण्यांबाबत तसेच सदर विमानभाड्याच्या [illegible] खर्चासाठी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यासाठी सदर समितीने मान्यता दिली. तथापि, सदर कंपनी निविदा प्रक्रियेतील काही अटी व शर्तींची पूर्तता करीत नसल्यामुळे सदर कंपनीकडून विमान भाडयाने घेण्याऐवजी निविदा प्रक्रियेत सहभाग असलेल्या मे.जीव्हीके एव्हिएशन प्रा.लि.मुंबई यांच्याकडून फाल्कन २००० हे विमान भाडयाने घेण्यास [illegible] प्रदत्त समितीने दिनांक ९.६.२०१० च्या बैठकीत मान्यता दिली आहे.

शासन **निर्णय –**

शासकीय कामकाजानिमित्त हवाई प्रवासासाठी मे. जीव्हीके एव्हीएशन प्रा.लि.मुंबई यांचेकडून फाल्कन 2000 विमान भाडेतत्वावर घेण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे. याप्रकरणी सदर कंपनीसमवेत करार करण्यासाठी सचिव(विमान चालन), सामान्य प्रशासन विभाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

या प्रकरणी शक्तीप्रदत्त समितीच्या दिनांक २२.४.२०१० व दिनांक ९.६.२०१० च्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार मे. जीव्हीके एव्हीएशन प्रा.लि.मुंबई यांचेकडून भाडेतत्त्वावर घ्यावयाच्या विमानाच्या संदर्भात करारणी करावयाच्या दरपत्रकाचा तपशील सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केला आहे.

याप्रित्यर्थचा चालू आर्थिक वर्षातील खर्च खालील लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून भागविण्यांत यावा आणि त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

मागणी क्रमांक- ए-४
२०७०,इतर प्रशासनिक सेवा,
११४, परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण
(००) (०२) विमान चालन सल्लागार,
महाराष्ट्र शासन (२०७०0१५६)

हा शासन निर्णय मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्तीप्रदत्त समितीने दिनांक २२ एप्रिल २०१० व दिनांक ९ जून,२०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक क्रमाक 201008071453240001 आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(अं.वि.अंभिरे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३. सचिव(विमान चालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, विमान चालन संचालनालय, जुहू, मुंबई
५. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य-१, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. वित्त विभाग(व्यय-४/अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई
९. अवर सचिव(विमान चालन)/(का.२५), सा.प्र.विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवड नस्ती.

परिशिष्ट

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग एव्हीएन २००९/प्र.क.६०३/२८अ दिनांक ३१ जुलै २०.. सोबतचे परिशिष्ट

मे.जी.व्ही.के.एव्हिएशन प्रा.लि.मुंबई यांचेकडून भाडेतत्वावर घ्यावयाच्या विमानासाठीच्या दरपत्रकाचा तपशील

अ.क.	बाब	
१	प्रति तास दर	१)१०० तास प्रतिवर्षी रु. २,५५,०००/- २)१५० तास प्रतिवर्षी रु.२,५५,०००/- ३)२०० तास प्रतिवर्षी रु.२,४५,०००/- ४)२५० तास प्रतिवर्षी रु.२,४०,०००/- अधिक सेवा कर आणि इतर शासकीय कर /शुल्क आकारणी उपरोक्त दर हे प्रत्यक्ष विमान इंधनाच्या (ATF) दराशी निगडीत असतील
२	विमानातील कर्मचारीवृंदाकरिता निवासव्यवस्था (crew accommodation)	प्रत्येक वास्तव्य/रात्री मुक्कामाकरिता रु.३५,०००/- किंवा निवासव्यवस्था शासनाने उपलब्ध करुन द्यावी.
३	विमान खोळंबा शुल्क (detention charges)	रात्रीकरिता: रु.३०,०००/-
४	हवाई वाहतूक देखरेख शुल्क (Watch hours charges)	प्रत्यक्ष शुल्क
५	विमानतळावर विमान उतरविण्याचे आणि ठेवण्याचे शुल्क (Landing ,parking over flight)	आंतरदेशीय : विनाशुल्क (complimentary) आंतरराष्ट्रीय: प्रत्यक्ष शुल्क
६	दोन वैमानिक , एक केबीन क्रू कर्मचारी आणि अभियंतायांच्या सेवा	अनुज्ञेय राहतील.